Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**३१/२०२१**

**विषय - कोविड-१९ विषाणू संसर्ग साखळी तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) प्रतिबंधात्मक आदेश**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक ४ जून, २०२१.

२. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/३४४/२०२१ दि.०५जून, २०२१

३. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थपना ११६५/ दि.०१ जून, २०२१

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपायोजनेअंतर्गत साथरोग कायदा व आपत्ती व्यवस्थापन कायदामधील तरतुदीनुसार त्या त्या जिल्हातील कोविड बाधीत रूग्णांचा पॉझीटीव्हीटी रेट व ऑक्सिजन बेड व्यापलेली टक्केवारी नुसार शासनाच्या निर्देशाप्रमाणे जिल्हा प्रशासनाने उपरोक्त संदर्भीय क्र. २ अन्वये कोल्हापूर जिल्हयासाठी स्तर - ४ निर्बंध दि.०७/०६/२०२१ रोजी पासून शासनाकडील पुढील आदेशापर्यंत मार्गदर्शक सुचना /आदेश लागू केले आहेत. त्यानुषंगाने विद्यापीठातील अधिविभाग, प्रशासकीय विभाग व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक यांनी शैक्षणिक व प्रशासकीय कामकाज करत असताना सदर्भ क्र. २ मधील आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, याबाबत खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी ऑनलाईन (Online) अध्यापन व अध्ययन सुरू ठेवावे. **(Work from Home)** तसेच त्याबाबतचा अनुपालन अहवाल विद्यापीठ कार्यालयास कळविण्यात यावा.

२. कोल्हापूर जिल्हा प्रशासनाच्या उपरोक्त संदर्भीय क्र. २ च्या आदेशानुसार विद्यापीठ व कोल्हापूर जिल्हामधील महाविद्यालयातील सर्व अधिविभाग / प्रशासकीय विभागातील विभाग प्रमुख यांनी अधिविभाग / विभागातील अधिकारी व प्रशासकीय सेवकांपैकी **२५%** याप्रमाणे अधिकारी व प्रशासकीय सेवक आळीपाळीने **(Rotation)** कार्यालयात उपस्थित राहतील याचे नियोजन करावे. शक्य असलेस संबधितांनी Online स्वरूपात कामकाज करावे. ज्या अधिकारी व प्रशासकीय सेवकांना कार्यालयात उपस्थित राहणेपासून सूट मिळेल त्यांनी घरी राहून **(Work from Home)** कार्यालयीन काम करावे. रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा यामध्ये समावेश करु नये. घरी राहून केलेल्या कामाचा अहवाल संबधितांनी विभागप्रमुखांना सादर करावा.

३. विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या सांगली व सातारा जिल्हामधील महाविद्यालयांनी महाराष्ट्र शासनाकडील उपरोक्त संदर्भीय क्र.१ च्या आदेशान्वये व आपल्या जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

४. अत्यावश्यक सेवा प्रदान करणाऱ्या विभागांची (अभियांत्रिकी विभागाअंतर्गत येणारे विभाग, उद्यान विभाग, आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, वाहन विभाग, इ.) सेवा व्यवस्थितरित्या सुरू राहील याची योग्य ती दक्षता संबधित विभागप्रमुख यांनी घ्यावी व त्याप्रमाणे नियोजन करावे.

५. ज्या अधिविभागात / विभागात एकत्रित मानधन व रोजंदारी सेवकांची सेवा अत्यावश्यक वाटते अशा रोजंदारी सेवकांची सेवा २५% पेक्षा जादा होणार नाही याची दक्षता घेवून संबधित सेवकांना उपस्थित राहणेबाबत अधिविभागप्रमुख / विभागप्रमुख यांनी आपल्या स्तरावर कळविण्यात यावे.

६. सदरचे आदेश पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील. तसेच उपरोक्त संदर्भीय महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचे कडून प्राप्त झालेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे.

७. महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडून वेळोवेळी प्राप्त होणारे आदेश लागू राहतील.

**(डॉ. विलास द. नांदवडेकर )**

कुलसचिव

**जा.क्र. आस्थापना/ WH-०१**

**दि. ०६/०६/२०२१**

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक

२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक

३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.